महाराष्ट्र पोलीस
पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल. बी. एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ १३८ /२०२३ दि. १२/०९/२०२३

## "वाहतूक नियंत्रण अधिसुचना"

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वागळे वाहतूक उपविभागाचे हद्दीत एल.आय.सी व रघुनाथनगर कडुन सर्व्हिस रोडने तिनहात नाका कडे जाण्यासाठी मेट्रोच्या कामामुळे प्रतिबंध करण्यात आले होते. तिनहात नाका या ठिकाणी मेट्रो पीलरचे काम पुर्ण करण्यात आले असुन सदर अधिसुचनेद्वारे एल आय सी व रघुनाथ नगर कडुन सर्व्हिस रोडने तिनहात नाका कडे जाण्यासाठी सर्व प्रकारच्या वाहनांना वाहतुकीसाठी मोकळा करण्यात येत आहे. तसेच तिनहातनाका या ठिकाणी वाहतुक कोंडी होवु नये याकरिता संकल्प चौक कडुन सुर्वेवाडी मार्गे तिनहात नाकाकडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना प्रतिबंध होणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** संकल्प चौक कडुन सुर्वेवाडी मार्गे तिनहात नाका कडे जाण्यासाठी तसेच सुर्वेवाडी येथील सोसायटीतील रहिवाशांच्या सर्व प्रकारच्या वाहनांना तिनहात नाका चौकात जाण्यासाठी **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** संकल्प चौकातुन येणारी वाहने सरळ तसेच सुर्वेवाडी कडुन येणारी वाहने उजवीकडे वळण घेवुन रघुनाथनगर मार्गे तिनहात नाका अथवा इच्छीत स्थळी जातील.

**टिप –** एल.आय.सी कडुन तसेच संकल्प चौक कडुन सर्व्हीस रोडने तिनहात नाका कडे जाण्यासाठी मार्ग सदर अधिसुचनेद्वारे खुला करण्यात येत आहे.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडॉर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

**प्रत कार्यवाहीकरीता :–**

प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे, बृहन्मंबई व वसई–विरार महानगरपालिका.
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

CamScanner

**प्रत** :— <u>पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे,ठाणे शहर</u>
२/— सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :— <u>समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे</u>
२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :— <u>सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व वागळे पो.निरी. वागळे, नौपाडा, कोपरी वाहतूक उप विभाग</u>.
२/— म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावी.

CamScanner